## महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक ०१.०३.२०१९ रोजी संपन्न झालेल्या ५० व्या बैठकीचे इतिवृत्त.

मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर, मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण यांच्या प्रमुख उपस्थितीत व मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव, मा.अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची ५० वी बैठक शुक्रवारी दिनांक ०१.०३.२०१९ रोजी दुपारी २.३० वा. सह्याद्री अतिथिगृह, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व मंडळ सचिव उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | मा. ना. श्री. संभाजी दिलीपराव पाटील निलंगेकर | मंत्री, कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन, माजी सैनिक कल्याण |
| २. | मा. श्री. ओमप्रकाश (मुन्ना) यादव | अध्यक्ष, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ |
| ३. | मा. श्री. राजेश कुमार, प्रधान सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. आर. आर. जाधव, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य | शासकीय प्रतिनिधी |
| ४. | मा. श्री. शशांक साठे, उप सचिव | शासकीय प्रतिनिधी |
| ५. | मा. श्रीमती वेदा आगटे | मालक प्रतिनिधी |
| ६. | मा. श्री. विजय देवरुखकर | कामगार प्रतिनिधी |
| ७. | मा. श्री. श्री. चु. श्रीरंगम् | सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई. |

बैठकीच्या सुरुवातीस मंडळ सचिव यांनी मा. मंत्री महोदय, मा. अध्यक्ष, मा. प्रधान सचिव, मा. कामगार आयुक्त, मंडळ सदस्य व सर्व उपस्थितांचे स्वागत केले व बैठकीत चर्चा करावयाच्या विषयांशी संबंधित कागदपत्रांचा संच व मंडळाचे मा. अध्यक्ष यांनी मंजूरी दिलेल्या दिनांक २४.०१.२०१९ रोजीच्या मंडळाच्या ४९ व्या बैठकीच्या इतिवृत्ताची प्रत मंजूर ठरावानुसार केलेल्या कार्यवाहीच्या अहवालासह सर्व उपस्थित सदस्यांना वाटप करण्यात आली.

तद्नंतर विषयसुचीनुसार चर्चेस सुरुवात करण्यात आली.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | बैठकीचा विषय | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| १. | मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे. | पृष्ठ क्र.०२ |
| २. | मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना पुरवठा करावयाच्या मध्यान्ह भोजन योजनेकरीता नियुक्त संस्था व दरस्विकृतीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर | पृष्ठ क्र.०३ ते १३ |
| ३. | मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना वाटप करण्यात येत असलेले सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाच्या पुरवठा आदेशातील संचाची संख्या वाढविणे व लाभ वाटपास मुदतवाढ देणेबाबत. | पृष्ठ क्र.१४ ते १८ |
| ४. | मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागू करणेबाबत. | पृष्ठ क्र.१९ ते २५ |
| ५. | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबत. | पृष्ठ क्र.२६ ते २७ |
| ६. | मंडळाच्या मुख्यालयातील कामकाजाकरीता संगणक, लॅपटॉप, प्रिंटर व स्कॅनर खरेदीस मंजूरी मिळणेबाबत. | पृष्ठ क्र.२८ ते ३० |
| ७. | मंडळाचे सन २०१८-२०१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०१९-२०२० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत. | पृष्ठ क्र.३१ ते ३२ |
| ८. | मंडळाचे सन २०१६-१७ व २०१७-२०१८ चे वार्षिक लेखे मंजूर करणेबाबत. | पृष्ठ क्र.३३ ते ३५ |
| ९. | मंडळाचे सन २०१४-१५ व २०१५-१६ चे वार्षिक अहवालास मंजूरी देणेबाबत. | पृष्ठ क्र.३६ ते ३७ |
| १०. | मंडळाच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक अहवालास मंजूरी देणेबाबत | पृष्ठ क्र.३८ ते ३९ |
| ११. | मंडळाच्या अतिरिक्त उपकर निधीच्या गुंतवणूकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे. | पृष्ठ क्र.४० ते ४२ |

## बैठकीचे इतिवृत्तांत

**विषय क्र. १: मागील बैठकीचे इतिवृत्तांत कायम करणे.**

मंडळ सचिवांनी सादर केले की, मंडळाच्या दिनांक २४.१.२०१९ रोजीच्या ४९ व्या बैठकीचे इतिवृत्तांत मंडळ सचिव यांनी वाचुन दाखविले. सदर इतिवृत्तांतातील ठरावात काही बदल करावयाचे असल्यास तसे सुचवावे त्यासह इतिवृत्तांत कायम करणे प्रस्तावित आहे.

मंडळाच्या दिनांक २४.१.२०१९ रोजीच्या ४९ व्या बैठकीच्या इतिवृत्ताबाबत सविस्तर चर्चेअंती मान्यता प्रदान करण्यात आली व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

**ठराव ५०(१)/२०१९ :- मंडळाच्या दिनांक २४.१.२०१९ रोजीच्या ४९ व्या बैठकीच्या इतिवृत्तांतास मान्यता देण्यात येत आहे, असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०२:- मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना पुरवठा करावयाच्या मध्यान्ह भोजन योजनेकरीता नियुक्त संस्था व दरस्विकृतीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर.**

या बाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरविणेबाबत मंडळाने पारित केलेल्या दि.२८.०२.२०१७ व दि.०६.०६.२०१७ च्या ठरावास अनुसरून मंडळाच्या दि.२२.०६.२०१७ रोजीच्या पत्रान्वये योजना मंजुरीचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावास अनुसरून शासनाच्या दि.२९.०७.२०१७ व दि.१६.०८.२०१७ च्या पत्रान्वये काही मुद्यांची माहिती विचारण्यात आली होती.

दरम्यान, मा. मंत्री महोदय, कामगार विभाग तथा अध्यक्ष महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांच्या उपस्थितीत दि.०३.०१.२०१८ रोजी संपन्न मंडळाच्या बैठकीत खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला होता.

**ठराव :- नोंदीत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजनेकरीता सादरीकरणानुसार योजनेचे गट, प्रायोगिक तत्वावरील ठिकाणे, प्रस्तावित लक्षांक, सुधारित निविदेच्या कामाचे स्वरूप, अटी, शर्ती व संस्था निश्चितेबाबतच्या अटी शर्तीस मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. सुधारित RFP डॉक्युमेंटस शासन मान्यतेस सादर करून ई-निविदा पध्दतीने संस्था निश्चित करण्यात यावी, संस्था निश्चितीचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करावा. शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.**

सदर ठरावास अनुसरून व शासन स्तरावरून विचारणा करण्यात आलेल्या मुद्यांच्या माहितीसह दि.१४.०२.२०१८ रोजी सुधारित प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरून शासनाच्या संदर्भिय क्र.०१ च्या दि.१२.०३.२०१८ च्या पत्रान्वये बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन पुरविण्याच्या योजनेस शासन मान्यता प्रदान करण्यात आली होती.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी राज्यातील ०३ गटामध्ये {१) मुंबई, नवी मुंबई आणि औरंगाबाद विभाग २) नाशिक व कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) ३) पुणे, अमरावती व नागपूर विभाग} मध्यान्ह भोजन योजना राबविण्याबाबत मंडळाने पारित केलेल्या ठरावानुसार मंडळाचे ई-

गर्व्हनन्स सल्लागार मे. केपीएमजी यांनी तयार केलेले RFP डॉक्युमेंटस मंडळाच्या दि.२८.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेस सादर करण्यात आले होते. प्रस्तावित ०३ गटाकरीता सादर RFP डॉक्युमेंटस ला शासनाच्या दि.२७.०३.२०१८ रोजीच्या पत्रान्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली होती.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. इबांका-२०१८/प्र.क्र.१३३/काम-७, दिनांक २३/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा. कामगार आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकरीता खरेदी समितीची स्थापना करण्यात आली आहे.

मध्यान्ह भोजन योजना राबविण्यासाठी निविदाकाराची निवड करण्यासाठी ०३ स्वतंत्र ई-निविदा सूचना दि.१७.०३.२०१८ रोजीच्या राज्यस्तरीय 'सकाळ' या मराठी व देश पातळीवरील 'दि इंडियन एक्सप्रेस' या इंग्रजी वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आल्या होत्या व दि.१९.०३.२०१७ पासून इच्छुक संस्थाकडून ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. ई-निविदांची निविदा पूर्व बैठक खरेदी समितीच्या उपस्थितीत दि.२६.०३.२०१८ रोजी घेण्यात आली होती. सदर निविदा पूर्व बैठकीमध्ये इच्छुक निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना अनुसरून मंडळाचे अभिप्राय शासनास सादर करण्यात आले होते. सदर मुद्याबाबत शासन स्तरावरून मंजूर केलेले अभिप्राय ई-निविदा पोर्टलवर निविदा अटी शर्तीचा भाग स्वरूपात प्रसिध्द करण्यात आले होते.

सदर ई-निविदेस एकूण ०४ वेळा मुदतवाढ देण्यात आली व निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दि.१५.०६.२०१८ अशी होती. निविदा सादर करण्याच्या अंतिम तारखेपर्यंत तीन गटामध्ये प्रत्येकी ०४ निविदाकारांनी निविदा सादर केल्या होत्या. सदर निविदा दि.१९.०६.२०१८ रोजी निविदा खरेदी समितीसमोर उघडण्यात आल्या व तांत्रिक बाबींची तपासणी करण्यासाठी मंडळाच्या ई-गर्व्हनन्स सल्लागार मे. केपीएमजी या संस्थेकडे सुपूर्द करण्यात आल्या. सदर ई-निविदामध्ये सादर केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करणेबाबत सर्व निविदाकारांना कळविण्यात आले व निविदाकारांकडून प्राप्त प्रती मंडळाच्या ई-गव्हर्नन्स सल्लागार यांच्याकडे सुपूर्द करण्यात आल्या होत्या. मंडळाच्या ई-गव्हर्नन्स सल्लागार यांनी याबाबत तयार केलेला छाननीचा तपशील खरेदी समितीच्या दि.२९.०९.२०१८ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता.

नोंदीत बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरविण्यासाठी प्राप्त निविदांच्या छाननीकरीता खरेदी समितीच्या खालीलप्रमाणे बैठका संपन्न झाल्या.

| अ.क्र. | खरेदी समितीची बैठक | बैठकीचा दिनांक |
|---|---|---|
| १. | निविदांची छाननी करणे | २९.०९.२०१८ |
| २. | निविदांची छाननी करणे | ०४.०१.२०१९ |
| ३. | निविदांची छाननी करणे | १९.०१.२०१९ व २२.०१.२०१९ |
| ४. | स्वयंपाकघर व प्रयोगशाळा तपासणीकरीता गठीत तांत्रिक समितीची बैठक | ०५.०२.२०१९ |
| ५. | सादर निविदा पात्र/अपात्र ठरविणे | १६.०२.२०१९ |
| ६. | व्यापारी लिफाफा उघडणे | १८.०२.२०१९ |
| ७. | न्यूनतम निविदाकारांनी सादर केलेल्या सुधारित दराबाबत विचारविनिमय करणे. | २५.०२.२०१९ |

खरेदी समितीच्या दि.२९.०९.२०१८ रोजीच्या बैठकीत निविदाकारांनी निविदेसोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या पृष्ठयर्थ लेखी खुलासा/ स्पष्टीकरण मागविण्यात आले होते. तसेच, मे. यशोधरा महिला सह. औद्योगिक उत्पादक संस्था या संस्थेने दि.२९.०९.२०१८ रोजी लेखी स्वरूपात सादर केलेल्या हरकतीबाबतही खुलासा सादर करण्याबाबत संबंधित निविदाकारांना कळविण्यात आले होते.

दरम्यानच्या कालावधीत तत्कालीन कामगार आयुक्त यांनी त्यांच्या दि.१६.१०.२०१८ रोजीच्या पत्रान्वये राज्य शासनाचे मार्गदर्शन मागविले होते. सदर पत्रास अनुसरून शासन मार्गदर्शन दि.२०.१२.२०१८ रोजी प्राप्त झाले. तदनंतर, निविदा खरेदी समितीची बैठक दि.०४.०१.२०१९ रोजी आयोजित करण्यात आली व सदर बैठकीत निविदाकारांच्या निविदेचा वैधता कालावधी पुढील ०२ महिने वाढविण्यासाठी निविदाकारांची लेखी सहमती प्रापत करणे व एका निविदाकारांची बँक गॅरंटी स्वरूपात सादर इसारा रक्कमेची मुदतवाढ ३०.०४.२०१९ पर्यंत वाढविण्यास संबंधित निविदाकारांना कळविणेबाबत निर्णय घेण्यात आला. त्यानुसार संबंधित निविदाकारांनी कळविण्यात आले. निविदाकारांकडून प्राप्त प्रतिसादानंतर दि.१९.०१.२०१९ व दि.२२.०१.२०१९ रोजी खरेदी समितीची बैठक आयोजित करून ०३ गटांकरीता प्राप्त प्रत्येक ०४ निविदांच्या तांत्रिक अटी शर्ती करीता अट क्र.PQ- ४ बाबत शासन मार्गदर्शन प्राप्त करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच, निविदा अटी शर्तीतील ४.१७ नुसार पात्र निविदाकारांच्या स्वयंपाकघर व प्रयोगशाळेची तपासणी करण्यासाठी तांत्रिक तपासणी पथक गठीत करण्यात आले.

तांत्रिक तपासणी पथकाने दि.०६.०२.२०१९ ते ०९.०२.२०१९ या कालावधीत ०३ पात्र निविदाकारांच्या ०४ स्वयंपाकघराची व प्रयोगशाळेची तपासणी करून तसा अहवाल मंडळास सादर केला आहे.

निविदेतील अट क्र. PQ-०४ बाबत दि.०१.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये शासन स्तरावरून कळविण्यात आले होते की, *The Prevention of Food Adultration Act, १९५४ व Food Safety and Standards Act, २००६ या दोन्ही अधिनियमातील तरतूद निविदा समितीने ग्राहय धरले आहे. त्यास शासनाची सहमती देण्यात येत आहे."*

खरेदी समितीच्या दि.१६.०२.२०१९ रोजीच्या बैठकीत निविदाकारांनी सादर केलेल्या दस्तऐवज याबाबत शासन स्तरावरून प्राप्त उपरोक्त मार्गदर्शन व तपासाणी पथकाने सादर केलेला तांत्रिक तपासणी अहवाल विचारात घेऊन ०३ गटांकरीता खालील ०४ निविदाकारांबाबत पात्र/ अपात्रतेचा निर्णय घेण्यात आला.

| अ.क्र. | निविदाकाराचे नाव | निविदा अटनिहाय वस्तुस्थिती | खरेदी समितीचा निर्णय |
|---|---|---|---|
| १. | मे. इन्डो अलाईड प्रोटिन फुडस् प्रा. लि | As the Bidder has complied ३ conditions regarding Payment details along with all ११ pre-qualification criteria (PQ), the Bidder is technically qualified. | पात्र |
| २ | मे. गुनिना कर्मशिअल प्रा. लि. | As the Bidder has complied ३ conditions regarding Payment details along with all ११ pre-qualification criteria (PQ), the Bidder is technically qualified. | पात्र |
| ३ | मे. पारसमल पगारिया अॅन्ड कंपनी प्रा. लि. | As the Bidder has complied ३ conditions regarding Payment details along with all ११ pre-qualification criteria (PQ), the Bidder is technically qualified. | पात्र |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | मे. यशोदरा महिला सहकारी औद्योगिक उत्पादक संस्था मर्यादित | The Bidder has complied ३ conditions regarding Payment details and out of ११ pre-qualification criteria (PQ)the Bidder has complied ५ pre-qualification criteria (i.e. PQ १, PQ ८, PQ ९, PQ १० and PQ ११). However, the Bidder has not complied ६ pre-qualification criteria (i.e. PQ २, PQ ३, PQ ४, PQ ५, PQ ६ and PQ ७). Hence, the Bidder is technically disqualified. | अपात्र |

तांत्रिक मुल्यमापनाच्या निर्णयानुसार पात्र निविदाकारांचे Commercial लिफाफे दि.१८.०२.२०१९ रोजी उघडण्याचा निर्णय घेण्यात आला व संबंधित पात्र निविदाकारांनी सदर बैठकीत उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले.

दि.१८.०२.२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता Commercial लिफाफे उघडण्यासाठी खरेदी समितीची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस सर्व पात्र ०३ निविदाकारांचे प्रतिनिधी हजर होते.

दि.१८/०२/२०१९ रोजी बैठकीत ॲड. विजय पी. लटांगे, औरंगाबाद यांनी मे. यशोधरा सह. औद्योगिक उत्पादक संस्था मर्यादित यांच्या वतीने मा. कामगार आयुक्त यांना पाठविलेल्या कायदेशीर नोटीसचा विचार करण्यात आला.

सदर ई-मेलद्वारे प्राप्त नोटीसमध्ये, या निविदेत सहभागी झालेल्या मे. इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि. यांनी अन्न व औषध व प्रशासन विभागाचा परवाना दि.२५/०५/२०१८ रोजी प्राप्त केला आहे त्यामुळे मे. इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि. यांना त्यापूर्वीचा Freshly Cooked Food तयार करण्याचा अनुभव नाही तसेच त्यांनी सादर केलेली उलाढाल ही Freshly Cooked Food ची नाही व म्हणून ते अपात्र होतात असे नमूद केले आहे.

सदर ई-मेलद्वारे प्राप्त नोटीसमध्ये पुढे, मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांनी अन्न व औषध व प्रशासन विभागाचा परवाना दि.०६/०४/२०१८ रोजी प्राप्त केला आहे त्यामुळे मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांना त्यापूर्वी Catering चा अनुभव नाही तसेच सदर निविदाधारकास Cooked

Food तयार करण्याचा व पुरवठा करण्याचा अनुभव नसून त्यांनी Canadian Yellow Lentil व Urid Dhal पुरवठयाचा अनुभव सादर केला आहे म्हणून ते अपात्र होतात असे नमूद केले आहे.

सदर दोन्ही निविदाकरांनी तांत्रिक बाबींची पूर्तता केली नसल्याचे नमूद करून दि.१७/०२/२०१९ रोजी खरेदी समितीने निविदेच्या तांत्रिक अटीबाबत घेतलेले निर्णय रदद करावेत व दि.१८/०२/२०१९ रोजी आयोजित बैठकीत Commercial लिफाफे उघडण्यात येऊ नयेत अन्यथा योग्य त्या न्यायालयात दाद मागण्यात येईल असे सदर ई-मेलद्वारे प्राप्त नोटीसमध्ये नमूद केले आहे.

खरेदी समितीने सदर ई-मेलद्वारे प्राप्त नोटीसमधील बाबींचा दि.१८/०२/२०१९ रोजीच्या बैठकीच्या सुरूवातीस विचार केला व निविदा अटी शर्तीमधील अनुभवाची अट असलेल्या PQ-०४ बाबत चर्चा केली.

PQ-०४ मध्ये खालीलप्रमाणे अनुभवाबाबत अट आहे.

The Bidder should have experience of at least १ work order for supply, delivery and distribution of freshly cooked hot meals/ ready to cook food packets/ food items within India of value not less than INR ६० Crores in Government (State/Central)/ Semi Government/ Corporation/ Organization in India in the last ५ financial years as on bid Submission date

OR

The Bidder should have experience of at least २ work order for supply, delivery and distribution of freshly cooked hot meals/ ready to cook food packets/ food items within India of value not less than INR ४० Crores in Government (State/Central)/ Semi Government/ Corporation/ Organization in India in the last ५ financial years as on bid Submission date

OR

The Bidder should have experience of at least ३ work order for supply, delivery and distribution of freshly cooked hot meals/ ready to cook food packets/ food items within India of value not less than INR ३० Crores in

Government (State/Central)/ Semi Government/ Corporation/ Organization in India in the last ५ financial years as on bid Submission date

उपरोक्त अटीमधील "The Bidder Should have experience for the supply of Freshly Cooked Hot Meals/ Ready to Cooked Food Packets/ Food items बाबत समितीने दि.१९/०१/२०१९ व दि.२२/०१/२०१९ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करून Food Safety and Standards Act २००६ व The Prevention of Food Adulteration Act १९५४ मधील "Food" च्या व्याख्येनुसार सदर ०२ निविदाधारकांकडे जरी experience for the supply of Freshly Cooked Hot Meals/ Ready to Cooked Food Packets चा अनुभव नसला तरी experience for the supply of Food items चा अनुभव असल्यामुळे सकृतदर्शनी सदर निविदाकार हे पात्र दिसतात तसेच याबाबत शासनाचे मार्गदर्शन घ्यावे असा निर्णय घेतला होता. शासनाने देखील त्यांचे पत्र दि.०१/०२/२०१९ नुसार त्यास सहमती दर्शविली आहे.

उपरोक्त शासन मार्गदर्शनाचा विचार करता तसेच तपासणी पथकाने उपरोक्त दोनही निविदाकारांच्या स्वयंपाकघराची व इनहाऊस प्रयोगशाळेची तपासणी अंती सादर केलेल्या अहवालाचा विचार करता आणि अन्नाच्या नमुन्यांचा तपासणी अहवाल विचारात घेता सदर दोन्ही निविदाकारांना खरेदी समितीने दि.१६/०२/२०१९ रोजीच्या बैठकीत पात्र ठरविले असल्यामुळे दि.१८/०२/२०१९ रोजी ई-मेलद्वारे प्राप्त ॲड. विजय पी. लटांगे यांच्या नोटीसचा नव्याने विचार करण्याची आवश्यकता नसून पात्र निविदाकारांचे Commercial लिफाफे उघडण्याचा निर्णय समितीने एकमताने घेतला.

त्याप्रमाणे दि.१८.०२.२०१९ रोजीच्या खरेदी समितीच्या बैठकीत पात्र निविदाकारांचे Commercial लिफाफे उघडण्यात आले असून त्याबाबतचा दरासह सविस्तर तपशील दि.१८.०२.२०१९ रोजीच्या इतिवृत्तांतात नमूद करण्यात आला आहे.

खरेदी समितीच्या दि. १८.०२.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय खालीलप्रमाणे आहेत.

१. उपरोक्त तीन गटातील न्यूनतम L१ निविदाकारांना, शासन निर्णय दि.०१/१२/२०१६ मधील वाटाघाटीची असलेली तरतूद विचारात घेता, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी दर कमी करण्याबाबत लेखी पत्र द्यावे.

२. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना मध्यान्ह भोजन पुरवठयासाठी राबविलेल्या ई- निविदा प्रक्रियेबाबत आजपर्यंत खालीलप्रमाणे बाबी निदर्शनास आल्या आहेत.

अ) मा. खासदार राजू शेटटी यांनी मध्यान्ह भोजन पुरवठयाच्या निविदा प्रक्रियेबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांना दि.२१/०५/२०१८ रोजी लिहलेले व मा. प्रधान सचिव, कामगार यांना दि.०१/१०/२०१८ रोजी लिहलेले पत्र.

ब) विधीमंडळाच्या सन २०१८च्या नागपूर येथील पावसाळी अधिवेशनात मध्यान्ह भोजन पुरवठयाच्या निविदा प्रक्रियेबाबत मा. माजी उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांनी चर्चेत उपस्थित केलेले मुद्दे.

क) उपरोक्त अ) व ब) बाबत माहे जुलै २०१८ मध्ये झी २४ तास या दूरचित्रवाहिनीवर प्रसिध्द झालेल्या बातम्या.

ड) तत्कालीन कामगार आयुक्त यांनी वरील अ), ब) व क) च्या पार्श्वभूमीवर दि.१६.१०.२०१८ रोजी शासनास सादर केलेले पत्र

इ) महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी यांनी या निविदा प्रक्रियेबाबत मागविलेली माहिती.

सर्वसाधारणपणे निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर खरेदी समितीने शासनाकडे निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव पाठविताना स्पष्ट शिफारस करणे अभिप्रेत आहे. तथापि, उपरोक्त अ), ब), क), ड) आणि इ) चा विचार करता न्यूनतम निविदाकार (L१) यांचे दर स्विकृतीबाबत शासन स्तरावर निर्णय घ्यावा अशी शिफारस करण्याचा निर्णय समितीने घेतला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ यांनी अनु. क्र.०१ येथे नमूद निर्णयानुसार तीनही गटातील न्यूनतम निविदाकार (L१) यांना त्यांचे दर कमी करण्याबाबत दि.२०.०२.२०१९ रोजी ई-मेलद्वारे पत्र

पाठविले. त्यानुसार तीनही गटातील न्यूनतम निविदाकारांनी (L१) त्या अनुषंगाने दर कमी करून तश्या आशयाचे लेखी पत्र मंडळास सादर केले आहे.

तीनही गटातील न्यूनतम निविदाकारांनी निविदेसोबत सादर केलेले दर व तदनंतर कमी केलेले दर यांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे गट निहाय सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गटाचे नाव | निविदा क्र. | न्यूनतम निविदाकार | निविदेतील प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दर रू. | सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दर रू. |
|---|---|---|---|---|---|
| १. | मुंबई व नवी मुंबई, औरंगाबाद विभाग | ०४ | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | ६३.५२/- | ६२.७५/- |
| २. | नाशिक व कोंकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) | ०५ | मे.इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि | ६३.४०/- | ६२.७३/- |
| ३. | पुणे विभाग, अमरावती विभाग व नागपूर विभाग | ०६ | मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी | ६३.०७/- | ६२.७०/- |

खरेदी समितीच्या दि.१८.०२.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार मंडळाच्या दि.२०.०२.२०१९ च्या पत्रान्वये न्यूनतम निविदाकारांनी सादर केलेल्या उपरोक्त सुधारित दरासह संस्था निश्चितीचा व दर स्विकृतीचा प्रस्ताव शासन निर्णयार्थ सादर करण्यात आला होता.

शासनाच्या दि.२१.०२.२०१९च्या पत्रान्वये खालीलप्रमाणे निर्देश दिले होते.

"खरेदी समितीच्या दिनांक १८.०२.२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णय क्र. २ मध्ये ई-निवीदा प्रक्रियेबाबत ५ बाबी निदर्शनास आल्याचे नमूद केले आहे. त्या मुद्यांबाबतची वस्तुस्थिती कृपया कळविण्यात यावी. तसेच, दिनांक १८.०२.२०१९ रोजीच्या बैठकीच्या वेळी समिती समोर अंतिम दर प्राप्त नव्हते. सदर दर दिनांक २०.०२.२०१९ रोजी प्राप्त झाले आहे. त्यामुळे, त्या दरांबाबत समितीचे कोणतेही अभिप्राय / शिफारस प्रस्तावात नमूद नाही. तरी, खरेदी समितीची बैठक आयोजित करुन दिनांक २०.०२.२०१९ रोजी प्राप्त झालेल्या दरांबाबत समितीचे अभिप्राय / शिफारस शासनास अवगत करावे."

शासनाच्या उपरोक्त निर्देशास अनुसरून करावयाच्या कार्यवाहीबाबत दि.२५/०२/२०१९ रोजी खरेदी समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत मंडळाकडून

दि.२०/०२/२०१९ रोजी शासनास सादर प्रस्ताव व शासन स्तरावरून दि.२१/०२/२०१९ रोजी प्राप्त निर्देशाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती शासनाच्या दि.२१.०२.२०१९ रोजीच्या पत्रातील सूचनेप्रमाणे वरीलप्रमाणे न्यूनतम निविदाकारांनी कमी केलेले दर शिफारशीसह राज्य शासनास मान्यतेस/ निर्णयास्तव पाठविण्यात यावे असा निर्णय घेऊन त्यानुसार सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमातर व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई यांनी शासनास प्रस्ताव पाठवावा असे निर्देश दिले.

खरेदी समितीच्या दि.२५/०२/२०१९ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांसाठी मध्यान्ह भोजन पुरविण्याकरीता ०३ गटांसाठी संस्था निश्चिती व दरस्विकृतीबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव शासन मान्यता/निर्णयार्थ सादर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | गटाचे नाव | निविदा क्र. | न्यूनतम निविदाकार | सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दर रू. |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई व नवी मुंबई, औरंगाबाद विभाग | ०४ | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | ६२.७५/- |
| २. | नाशिक व कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) | ०५ | मे.इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि | ६२.७३/- |
| ३. | पुणे विभाग, अमरावती विभाग व नागपूर विभाग | ०६ | मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी | ६२.७०/- |

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता मध्यान्ह भोजन पुरविण्यासाठी मंडळाने वेळोवेळी पारित केलेले ठराव, शासन स्तरावरून योजना राबविण्यास प्रदान मान्यता, पुरवठा संस्था व दर निश्चितीकरीता राबविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया, ई-निविदा प्रक्रियेदरम्यान निविदा पूर्व बैठक, निविदापूर्व बैठकीतील मुद्याबाबतचे अभिप्राय, खरेदी समितीच्या बैठकीत निर्णय याबाबतची संपूर्ण कार्यवाही मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे.

शासनास सादर उपरोक्त प्रस्तावास शासन मान्यता प्राप्त झाल्यानंतर, त्यानुसार, गटनिहाय नियुक्त संस्थेसोबत निविदेतील अटी व शर्ती नुसार गटनिहाय नियुक्त संस्थेसोबत रीतसर करारनामा करून कार्यादेश देण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल असे प्रस्तावित आहे.

उपरोक्त प्रस्तावाबाबत मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५०(२)/२०१९ :- मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना कामाच्या ठिकाणी व नाक्यावर मध्यान्ह भोजन पुरविण्यासाठी मंडळाने वेळोवेळी पारित केलेले ठराव, शासनस्तरावरून योजना राबविण्यास प्रदान मान्यता, पुरवठादार संस्था व दर निश्चितीकरीता मंडळ स्तरावरून राबविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया, ई-निविदा प्रक्रियेदरम्यान निविदापूर्व बैठकीत इच्छुक निविदाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्यांना अनुसरून मुद्येनिहाय अभिप्रायास प्राप्त शासन मान्यता, खरेदी समितीच्या वेळोवेळी संपन्न ०७ बैठकीतील निर्णय, गटनिहाय खालीलप्रमाणे नियुक्त संस्था व सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजनाच्या दरास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | गटाचे नाव | निविदा क्र. | न्यूनतम निविदाकार | सुधारित कमी केलेले प्रति लाभार्थी प्रति मध्यान्ह भोजन दर रू. |
|---|---|---|---|---|
| १. | मुंबई व नवी मुंबई, औरंगाबाद विभाग | ०४ | मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. | ६२.७५/- |
| २. | नाशिक व कोकण विभाग (मुंबई व नवी मुंबई वगळून) | ०५ | मे.इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि | ६२.७३/- |
| ३. | पुणे विभाग, अमरावती विभाग व नागपूर विभाग | ०६ | मे. पारसमल पगारिया ॲण्ड कंपनी | ६२.७०/- |

**शासनमान्यतेअंती गटनिहाय नियुक्त उपरोक्त ०३ संस्थांसोबत रीतसर करारनामा करून प्रथम प्रायोगिक तत्तावर मुंबई, ठाणे व नागपूर या ०३ ठिकाणी मध्यान्ह भोजन पुरवठयाचे कार्यादेश देण्यास व तदनंतर नियमित पुरवठा आदेश देण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे, असा ठराव पारित करण्यात आला.**

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.०३ :- मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांना वाटप करण्यात येत असलेले सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाच्या पुरवठा आदेशातील संचाची संख्या वाढविणे व लाभ वाटपास मुदतवाढ देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २२.०९.२०१७ रोजीच्या बैठकीत ठरावाअन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना अत्यावश्यक वस्तू संच व सुरक्षा संच पुरविण्याबाबतचा ठराव पारित करण्यात आला होता.

त्याअनुषंगाने राज्यातील बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच पुरविणेबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या दिनांक ०३.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये शासन मान्यतेकरीता सादर करण्यात आलेला होता. दिंनाक २२.११.२०१७ व २३.११.२०१७ च्या शासन निर्णयान्वये सदर दोन योजना राबविण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता.

शासन मान्यतेनुसार मंडळस्तरावर दि.२८.११.२०१७ पासून दि. २१.१२.२०१७ पर्यंतच्या कालावधीत ई-निवीदा प्रक्रिया अवलंबविण्यात आली व पात्र निवीदांचे दर स्वीकृतीचा प्रस्ताव दि.२१.०३.२०१८ रोजी शासनास सादर करण्यात आलेला आहे. शासनाच्या दि.०९.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये संस्था निश्चितीस मान्यता देण्यात आली, व दि. २४.०४.२०१८ रोजीच्या पत्रान्वये दर स्वीकृतीच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात आली होती.

मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांच्या नियुक्तीस शासन व मंडळाने दिलेल्या मान्यतेनुसार दि.३०.०५.२०१८ रोजी सदर दोन्ही पुरवठादार कंपनीसोबत करारनामा करूनमे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. व मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांना दि. १४.०६.२०१८ रोजी पुरवठा आदेश देण्यात आले होते.

मे.गुनिना कमर्शिअल प्रा.लि. व मे. इंडो अलाईड प्रोटीन फुडस प्रा.लि. यांनी दि. १९ जाने २०१९ पर्यंत वाटप केलेल्या अत्यावश्यक संच व सुरक्षा संचाचा जिल्हानिहाय तपशिल दि.२४.०१.२०१९ रोजीच्या मंडळ बैठकीत सादर करण्यात आला होता.

दि.२७.०२.२०१९ पर्यंत अत्यावश्यक व सुरक्षा संच वाटप केल्याचा जिल्हयानिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

## अत्यावश्यक संच व सुरक्षा संच वाटप केल्याचा जिल्हानिहाय तपशिल

| अ.क्र | जिल्हयाचे नाव | अत्यावश्यक संच संख्या | सुरक्षा संच संख्या |
|---|---|---|---|
| १. | नागपूर | ३८८७५ | ३८८७४ |
| २. | वर्धा | ३०९७० | ३०९७४ |
| ३. | नाशिक | १२०२९ | १२०२९ |
| ४. | बीड | ८०१४ | ८०१६ |
| ५. | पुणे | ७६८४ | ७६८४ |
| ६. | भंडारा | ७१७१ | ७१७१ |
| ७. | लातूर | ६२४२ | ६२४२ |
| ८. | गोंदीया | ६०२७ | ६०२७ |
| ९. | मुंबई शहर | ५०५१ | ५०४० |
| १०. | अहमदनगर | ४७८३ | ४७८३ |
| ११. | चंद्रपूर | ४५१२ | ४५१२ |
| १२. | यवतमाळ | ३७७४ | ३७७४ |
| १३. | मुंबई उपनगर पश्चिम | ३३२३ | ३३२३ |
| १४. | अकोला | ३२३२ | ३२३२ |
| १५. | पालघर | २७९२ | २७९२ |
| १६. | औरंगाबाद | २५६१ | २५६१ |
| १७. | सोलापूर | २३३९ | २३३९ |
| १८. | जालना | २१९४ | २१९४ |
| १९. | मुंबई उपनगर पुर्व | १७८८ | १७८८ |
| २०. | कल्याण | १४९६ | १४९६ |
| २१. | सिंधुदुर्ग | ११५० | ११५० |
| २२. | वाशिम | ११४१ | ११४१ |
| २३. | रायगड | १११४ | १११४ |
| २४. | ठाणे | ८८२ | ८८२ |
| २५. | रत्नागिरी | ८४० | ८४० |
| २६. | भिवंडी | १५९ | १५९ |
| २७. | | १५० | १५० |
| | **एकुण** | **१६०२९३** | **१६०२८७** |

मे. गुनिना कमर्शिअल प्रा.लि. यांनी दि.१४.०२.२०१९ व मे. इंडो अलाईड प्रोटीन फूडस प्रा.लि. यांनी दि.१५.०१.२०१९ रोजीच्या पत्रान्वये सदर योजना नाविन्यपूर्ण असल्याने व सदर योजनेकरीता प्रत्येक गावा गावात वितरण करण्यास वेळ लागत आहे तसेच, जिल्हा कार्यालयातील सरकारी कामगार अधिकारी/ प्राधिकृत अधिकारी सुरूवातीच्या कालावधीत उपलब्ध होऊ शकले नाही. त्यामुळे संच वाटपाचे कॅम्प विलंबाने आयोजित करण्यात आले होते. सद्यस्थितीत वरीलप्रमाणे जिल्हानिहाय १,६०,००० नोंदीत बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाचे वितरण करण्यात आलेले आहे. करारनाम्यात नमूद केल्याप्रमाणे पुरवठा आदेश मिळाल्यापासून ०१ वर्षे अथवा ०१ वर्षात २.२५ लक्ष संचाचे वाटप करारनाम्यातील मुद्दा क्र.३.१४ नुसार करावयाचे आहे. त्यानुसार मंडळाकडे बांधकाम कामगारांच्या नोंदणीत झालेली वाढ विचारात घेता व सदर नोंदीत लाभार्थी लाभापासून वंचति राहू नये याकरीता करारनाम्यातील अटी शर्ती व मंजूर दराने संच वाटपास मुदतवाढ व अतिरिक्त संच वाटपाचे पुरवठा आदेश देण्यात विनंती केली आहे.

मंडळाकडे सद्यस्थितीत सुमारे १३.७५ लक्ष बांधकाम कामगारांची नोंदणी झालेली असून त्यापैकी ९.५० लक्ष बांधकाम कामगार सक्रिय (जिवीत) आहेत. सुरक्षा संच व अत्यावश्यक संचाकरीता नियुक्त पुरवठादार संस्थांनी वाटप केलेला जिल्हानिहाय तपशील विचारात घेता दि.२७.०२.२०१९ पर्यंत १,६०,००० बांधकाम कामगारांना संचाचे वाटप झालेले आहेत. सदर संस्थांना संच वाटपाकरीता दिलेली मुदत दि.१४.०६.२०१९ रोजी संपुष्टात येईल. दरम्यानच्या कालावधीत अपेक्षित आचारसंहिता कालावधी विचारात घेता मंडळाकडील सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना संच वाटप करण्यासाठी मुदतवाढ देणे आवश्यक आहे. त्यानुसार पुरवठादार संस्थांना दयावयाची मुदतवाढ व अतिरिक्त पुरवठयाची संख्या निश्चितीकरीता प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात आला आहे.

याबाबत मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. मालक प्रतिनिधी श्रीम. वेदा आगटे यांनी सदर मुदतवाढ देण्याची आवश्यकता आहे काय? असा मुद्दा उपस्थित केला आहे. यावर, सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, मंडळ व शासन मान्यतेअंती दि.१४.०६.२०१८ रोजी २,२५,००० नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना अत्यावश्यक संच व सुरक्षा संच पुरवठयाचे आदेश नियुक्त संस्थांना देण्यात आले होते. त्यानुसार नियुक्त संस्थांनी केलेल्या जिल्हा निहाय पुरवठयाबाबत मंडळाच्या दिनांक २४.०१.२०१९ रोजीच्या बैठकीत ७७,५७८ अत्यावश्यक संच व ७९,५७२ सुरक्षा संच वाटपचा अहवाल सादर

करण्यात आला होता. व आजच्या बैठकीत १,६०,२९३ अत्यावश्यक संच व १,६०,२८७ सुरक्षा संच वाटपाचा जिल्हानिहाय तपशील सादर केलेला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता ४२ जिल्हा कार्यालयांपैकी २६ जिल्हा कार्यालयातच संचाचे वाटप झालेले आहे. त्यापैकी केवळ ०३ जिल्हयांत जास्त प्रमाणात संच वाटप झाले. तथापि, अन्य २३ जिल्हयात अल्प प्रमाणात संचाचे वाटप झालेले आहे. याशिवाय, उर्वरित १६ जिल्हा कार्यालयात अद्याप वाटपास सुरूवात झालेली नाही. मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव, कामगार विभाग तसेच मा.कामगार आयुक्त यांच्या उपस्थित दि. २९.१०.२०१८ रोजी संपन्न क्षेत्रिय कार्यालयाच्या आढावा बैठकीत मंडळाकडे नोंदीत सर्व बांधकाम कामगारांना संच पुरवठा करणेबाबतचा निर्णय घेण्यात आला होता व तश्या सूचना मंडळ स्तरावरून जिल्हा कार्यालयांना देण्यात आल्या होत्या. सद्यस्थितीत मंडळाकडे नोंदीत बांधकाम कामगारांची संख्या १३.५० लक्ष व सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांची संख्या ९ लक्ष एवढी आहे. तसेच, नजीकच्या कालावधीत लोकसभा व विधानसभेची निवडणूक आचारसंहिता लागू होणे अपेक्षित आहे. संभाव्य निवडणूक आचारसंहिता कालावधीत संचाचे वाटप करता येणार नाही, ही बाब विचारात घेता संच वाटपास मुदतवाढ व अतिरिक्त संच वाटपाचे पुरवठा आदेश देणे आवश्यक आहे. याबाबत किती मुदतवाढ दयावयाची व मूळ पुरवठा आदेशात नमूद २,२५,००० संच वाटपाशिवाय किती अतिरिक्त संच वाटपाची आदेश दयावयाचे आहे त्याबाबत मंडळ बैठकीत निर्णय घेण्यात यावा. यासंदर्भात, सविस्तर चर्चेअंती मा. मंत्री महोदयांनी निर्देश दिले की, जिल्हा कार्यालय निहाय वाटपाच्या स्थितीचे अवलोकन केले असता काही जिल्हयामध्ये अत्यल्प वाटप झालेले आहे. तसेच, १६ जिल्हा कार्यालयात अद्याप वाटपास सुरूवात झालेली नाही. ज्या जिल्हयामध्ये अद्याप वाटप झालेले नाही अथवा अत्यल्प वाटप झालेले आहे त्या जिल्हयातील लोक प्रतिनिधीकडून संच वाटपाबाबत विचारणा होत आहे. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी काही बांधकाम कामगारांना संच वाटप करणे व काही बांधकाम कामगारांना संच वाटप न करणे ही बाब योग्य ठरणार नाही यास्तव मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटप करणे योग्य राहील. संच वाटपाकरीता मुदतवाढ देणेही आवश्यक आहे. याबाबत, निविदेमधील तरतूद तपासून प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा. तसेच, ज्या जिल्हयांमध्ये संचाचे अल्प वाटप झालेले आहे किंवा अद्याप वाटप झालेले नाही त्या जिल्हयामध्ये प्राधान्याने संच वाटप करण्याबाबत पुरवठादार संस्थांना मंडळस्तरावरून निर्देश देण्यात यावेत.

मा. मंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार करावयाच्या कार्यवाहीस सर्व सदस्यांनी सहमती दर्शविली व अतिरिक्त संच वाटपाची संख्या व त्यानुसार मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा असे ठरले व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५०(३)/२०१९ :- मंडळ स्तरावरून देण्यात आलेल्या पुरवठा आदेशानुसार पुरवठादार संस्थांनी दि.१९.०१.२०१९ पर्यंत सुरक्षा संच व अत्यावश्यक संच वाटपाबाबत केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात येत आहे. ज्या जिल्हयामध्ये अत्यल्प संच वाटप झालेले आहे किंवा अद्यापही संच वाटपास सुरूवात झालेली नाही त्या जिल्हयात प्राधान्याने वाटप करणेबाबत पुरवठादार संस्थांना सूचना देण्यात यावी. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) सर्व बांधकाम कामगारांना सुरक्षा संच व अत्यावश्यक वाटप करणे आवश्यक आहे. अतिरिक्त सुरक्षा संच व अत्यावश्यक संच पुरवठयाची संख्या निश्चिती व त्यानुसार मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र. ०४:- मंडळातील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागु करण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. प्रधान सचिव यांचे प.क्र: असंका-२०१९/प्र. क्र.२८/काम-७अ दि. २६.०२.२०१९ अन्वये प्रधानमंत्री श्रम योगी मानधन (PM-SYM) योजना लागु करुन या योजनेमध्ये जास्तीत जास्त कामगारांची नोंदणी करून योजनेचा लाभ देणेबाबत खालीलप्रमाणे सुचना प्राप्त झालेल्या आहेत.

केंद्र शासनाने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केलेला आहे. त्या अनुषंगाने विविध व्यवसाय गट जसे कि बांधकाम कामगार, माथाडी कामगार, सुरक्षा रक्षक, घरेलु कामगार, फेरीवाले, शेतमजुर, गृहउद्योगातील कामगार, माथाडी कामगार, बिडी कामगार, यंत्रमाग कामगार, आशा वर्कर, आंगणवाडी सेविका यासारख्या विविध १२७ व्यवसाय गटातील असंघटीत कामगारांना सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजना लागु करण्याबाबतचा निर्णय केंद्र शासनाने घेतला आहे दि. १५.०२.२०१९ पासुन नोंदणी शुभारंभ करण्यात आला आहे. योजनेस दि. १५.०२.२०१९ पासुन सुरूवात करण्यात आली आहे.

शासनाच्या उपरोक्त पत्रान्वये प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी कार्यप्रणालीचे विवरण पत्र सोबतच्या प्रपत्र -१ नुसार कळविण्यात आलेले आहेत.

प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबतची माहिती पुढीलप्रमाणे कळविण्यात आलेली आहे:

अ) **लाभार्थी पात्रता :-**

- असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार
- मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी
- कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसावा

ब) **आवश्यक कागद पत्रे :-**

- आधार कार्ड
- बँक पासबुक (राष्ट्रीय कृत बँक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बँक)

- भ्रमणध्वनी (OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा)

क) **योजनेचा लाभ :-**

- वय वर्ष ६० पूर्ण केल्यानंतर दरमहा रु. ३०००/-मानधन
- लाभार्थी कामगारांचा मृत्यू झाल्यास त्याच्या वैवाहिक जोडीदारास योजना सुरु ठेवता येणार
- लाभार्थीस स्वेच्छेने योजनेतून बाहेर पडावयाचे झाल्यास जमा केलेल्या अंशदानासह व्याजाची रक्कम परत मिळणार.

केंद्र शासनाचे कामगार व रोजगार मंत्रालयाने दिलेल्या निर्देशानुसार प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेत नोंदणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१. योजनेमध्ये असंघटीत क्षेत्रामध्ये काम करणारा वय वर्ष १८ ते ४० दरम्यानचा कामगार, मासिक उत्पन्न १५०००/- रु. पेक्षा कमी असणारा व कर्मचारी राज्य बिमा निगम, भविष्य निर्वाह निधी अथवा राष्ट्रीय पेन्शन योजनेचा सभासद नसणारा कामगार पात्र आहेत.

२. १८ ते ४० वयोगटातील लाभार्थीने रु.५५ ते २००/- पर्यंत प्रतिमाह (वयाची ६० वर्षे पूर्ण होईपर्यंत)अंशदान जमा केल्यानंतर लाभार्थीस वयाची ६० वर्ष पुर्ण केल्यानंतर दरमहा किमान ३०००/- रुपये निवृत्तीवेतन देय राहिल.

३. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस नजिकच्या नागरी सुविधा केंद्रास (Common Service Centres) भेट दयावी लागेल.

४. लाभार्थीस नागरी सुविधा केंद्रामध्ये गेल्यानंतर योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी खालील कागदपत्रे उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

    क) आधार कार्ड

    ख) बॅक पासबुक ( राष्ट्रीय कृत बॅंक अथवा IFSC कोड असलेली इतर कोणतीही बॅक)

    ग) भ्रमणध्वनी ( OTP करीता स्वत:चा अथवा कुटुंबातील अन्य व्यक्तीचा )

    घ) पहिले मासिक अंशदान(वयानुसार, रोख स्वरुपाने)

५. नागरी सुविधा केंद्रामार्फत बॅंक खात्याचा तपशील, ई-मेल आयडी, वारसदार (पती-पत्नी) व भ्रमणध्वणी क्रमांक याबाबतचा तपशील अद्यावत केला जाईल.

६. लाभार्थीच्या वयानुसार अंशदानाची रक्कमेची गणना ऑनलाईन सिस्टीमद्वारे करण्यात येईल. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी, पात्र लाभार्थीच्या वयानुसार, पहिल्या मासिक अंशदानाची रक्कम रोखीने अदा करावी लागेल (प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना वय

निहाय मासिक वर्गणीचा तक्ता दर्शविणारे प्रपत्र — २ सोबत जोडले आहे). अंशदानाची रक्कम भरणा केल्याची पावती संबंधीत नागरी सुविधा केंद्राकडून लाभार्थीस देण्यात येईल.

७. दुस-या मासिक अंशदानापासून लाभार्थीचे अंशदानाची रक्कम लाभार्थीचे बँक खात्यातुन परस्पर कपात (auto-debit) करण्यात येईल.

८. लाभार्थीने योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी योजनेच्या अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र व छापील सहमती पत्र, स्कॅन करण्यात येऊन सिस्टीमवर अपलोड करण्यात येईल.

९. पहिले मासिक अंशदान जमा केल्यानंतर प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजनेंतर्गत LIC द्वारे पेन्शन खाते क्रमांक जारी करण्यात येईल.

१०. नोंदणीची प्रकिया पुर्ण झाल्यानंतर लाभार्थीस प्रधानमंत्री श्रम योगी मानधन कार्ड व स्वाक्षरी केलेले स्वंयघोषणा पत्र देण्यात येईल.

११. प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना खाते सुरू झाल्यानंतर लाभार्थीस लाभार्थीचे बॅक खात्यातुन परस्पर कपात केलेल्या अंशदानाची माहीती एसएमएस द्वारे देण्यात येईल.

१२. योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी लाभार्थीस इतर कोणतेही शुल्क नागरी सुविधा केंद्रास अदा करावे लागणार नाही. त्याबाबतचे शुल्क नागरी सुविधा केंद्रास केंद्र शासनाकडून परस्पर अदा करण्यात येईल.

- केंद्र शासनच्या कामगार विभागामार्फत ३१ मार्च २०१९ अखेर दोन कोटी लाभार्थीचा योजनेमध्ये सहभागी करण्याचा लक्षांक ठेवण्यात आलेला असल्याने महाराष्ट्र राज्यामध्ये ३१ मार्च २०१९ अखेर, राज्यात असणारे सुमारे ४६००० नागरी सुविधा केंद्राकडून,प्रत्येकी किमान १०० या प्रमाणे, लाभार्थीची नोंदणी करणे आवश्यक आहे.
- मंडळाच्या अध्यक्षांनी कामगारांच्या संघटनांबरोबर व कामगारांसोबत बैठकीचे आयोजन करुन मार्गदर्शन करण्यात यावे. आपल्या अधिनस्थ कामगारांना योजनेबाबत माहिती देण्यात यावी व जास्तीत जास्त कामगारांनी सदरचे योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करुन, जनजागृती करण्यात यावी.
- प्रधान मंत्री श्रमयोगी मानधन योजनेबाबत दि. २६ फेब्रुवारी, २०१९ रोजी मा. कॅबिनेट सेक्रेटरी/केंद्र शासन यांनी आयोजित केलेल्या व्हिडिओ कॉन्फरन्समध्ये उपरोक्त निर्देश दिले आहेत की, राज्यांच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागांच्या अधिका-यांना सदर योजनेत

अधिकाअधिक नोंदणी करण्याबाबत अवगत करावे तसेच सदर मंडळाद्वारे आपल्या मंडळातील नोंदित कामगारांचे प्रथम वर्षाचे अंशदान भरण्यात यावे असे निर्देश प्राप्त झालेले आहेत.

➤ मा. प्रधान सचिव कामगार विभाग यांच्या दि.२६.०२.२०१९ रोजीच्या पत्रातील उपरोक्त निर्देश विचारात घेता महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडील नोंदित बांधकाम कामगारांना प्रधान मंत्री श्रम योगी मानधन योजना लागु करण्याबाबत खालीलप्रमाणे प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

१. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील व उपरोक्त लाभार्थी पात्रता धारण करणाऱ्या बांधकाम कामगारांना सदर योजना लागु करण्यास मान्यता प्रदान करावी.

२. मंडळाकडील नोंदित सक्रीय (जीवित) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० वयोगटातील लाभार्थ्याने भरावयाची रु.५५/- ते २००/- पर्यंत प्रति महा (वयाची ६० वर्षे पुर्ण होईपर्यंत) भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम १ वर्षाची अंशदान मंडळाकडुन भरण्यात यावी व तद्नंतर लाभार्थ्याच्या बॅंक खात्यातून अंशदानाची रक्कम परस्पर कपात करण्यात यावी.

३. ०१ वर्षानंतर लाभार्थ्याच्या बॅंक खात्यातू दरमहा परस्पर अदा केलेल्या अंशदानाच्या रक्कमेचा परतावा (Reimursement) मंडळाकडून करण्यात यावी.

४. सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त कामगारांनी घ्यावा, योजनेमध्ये सहभागी व्हावे याकरिता व्यापक स्तरावर, स्थानिक लोकप्रतिनिधींना सहभागी करून जनजागृती करण्यास व त्यावरील खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करावी.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी १८ ते ४० या वयोगटातील पात्र लाभार्थ्यांना सदर योजना लागू करण्यात यावी. पात्र बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी ०१ वर्षाचा अंशदान मंडळाकडून अदा करण्यात यावे. सदर अंशदानाची रक्कम नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करण्यात यावी. सदर योजनेची माहिती नोंदीत बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्यासाठी पुरेशी प्रसिध्दी देण्यात यावी यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शवलि व त्यानुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव ५०(४)/२०१९ :- मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांपैकी पात्र बांधकाम कामगारांना प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन (PM-SYM) योजना लागू करण्यात यावी. बांधकाम कामगाराने भरावयाच्या अंशदानाच्या रक्कमेपैकी प्रथम ०१ वर्षाचे अंशदान मंडळाने नागरी सुविधा केंद्रामार्फत अदा करावे. सदर योजनेची माहिती सर्व बांधकाम कामगारांपर्यंत पोहचण्याकरीता आवश्यक प्रसिध्दी देण्यात यावी. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी. असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

## प्रधानमंत्री श्रमयोगी मानधन योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी कार्यप्रणाली-

प्रपत्र -१

लाभार्थी आधारकार्ड बँक पासबुक व भ्रमणध्वनी क्रमांकासह नागरी सु विधा केंद्रास भेट देईल.

↓

नागरी सु विधा केंद्राकडुन लाभार्थींची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्यात येईल.

↓

लाभार्थीच्या वयानुसार मासिक अंशदानाच्या रक्कमेची गणना सिस्टीमद्वारे ऑनलाईन करण्यात येईल.

↓

लाभार्थीकडुन पहील्या महिन्याच्या अंशदानाची रक्कम नागरी सुविधा केंद्रास रोखीने अदा करण्यात येईल.

↓

अंशदानाची रक्कम अदा केल्यानंतर श्रमयोगी मानधन योजनेचा ऑनलाईन क्रमांक प्राप्त होईल.

↓

लाभार्थीची स्वाक्षरी करण्यासाठी स्वंयम घोषणा पत्राचा नमुना प्राप्त होईल.

↓

लाभार्थीने स्वाक्षरी केलेले स्वंयम घोषणा पत्र नागरी सुविधा केंद्राकडुन स्कॅन करण्यात येऊन सिस्टीममध्ये अपलोड करण्यात येईल.

↓

नागरी सुविधा केंद्रामार्फत श्रम योगी कार्डची प्रिंट काढण्यात येऊन लाभार्थीस सुपूर्त करण्यात येईल.

↓

बँके कडुन खातर जमा केल्यानंतर नियमित् अशंदानाबाबतची माहिती लाभार्थीस एसएमएसद्वारे उपलब्ध करून देण्याची सुविधा सुरू होईल.

↓

भविष्यामध्ये जमा होणाऱ्या अंशदानाबाबतची माहिती लाभार्थीस एसएमएसद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल.

प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना वय निहाय मासिक वर्गणीचा तक्ता दर्शविणारे

प्रपत्र -२

| योजनेत सहभागी होण्याचे वय | मानधन मिळण्याचे वय | लाभार्थीची मासिक वर्गणी (रु.) | केंद्रशासनाची मासिक वर्गणी (रु.) | एकूण मासिक वर्गणी(रु.) |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) ¾ (३)+(४) |
| १८ | ६० | ५५ | ५५ | ११० |
| १९ | ६० | ५८ | ५८ | ११६ |
| २० | ६० | ६१ | ६१ | १२२ |
| २१ | ६० | ६४ | ६४ | १२८ |
| २२ | ६० | ६८ | ६८ | १३६ |
| २३ | ६० | ७२ | ७२ | १४४ |
| २४ | ६० | ७६ | ७६ | १५२ |
| २५ | ६० | ८० | ८० | १६० |
| २६ | ६० | ८५ | ८५ | १७० |
| २७ | ६० | ९० | ९० | १८० |
| २८ | ६० | ९५ | ९५ | १९० |
| २९ | ६० | १०० | १०० | २०० |
| ३० | ६० | १०५ | १०५ | २१० |
| ३१ | ६० | ११० | ११० | २२० |
| ३२ | ६० | १२० | १२० | २४० |
| ३३ | ६० | १३० | १३० | २६० |
| ३४ | ६० | १४० | १४० | २८० |
| ३५ | ६० | १५० | १५० | ३०० |
| ३६ | ६० | १६० | १६० | ३२० |
| ३७ | ६० | १७० | १७० | ३४० |
| ३८ | ६० | १८० | १८० | ३६० |
| ३९ | ६० | १९० | १९० | ३८० |
| ४० | ६० | २०० | २०० | ४०० |

**विषय क्र.०५ :- मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जन आरोग्य योजना राबविण्याबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना सार्वजनिक आरोग्य विभागाच्या दि.०२.०६.२०१७ रोजीच्या शासन आदेशान्वये महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना लागू करण्यात आलेली आहे. मंडळाकडील ज्या नोंदीत बांधकाम कामगाराकडे दारिद्र रेषेखालील पिवळी, अत्योंदय अन्न योजना, अन्नपूर्णा योजना शिधापत्रिका कुटूंबे आणि दारिद्रयरेषेवरील (रू. १ लक्षापर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या) केशरी शिधापत्रिका नाही अशा बांधकाम कामगारांच्या विम्याची रक्कम मंडळाकडून भरण्यात आलेली आहे. तसेच, नवीन नोंदीत झालेल्या बांधकाम कामगारांची माहिती प्राप्त करून त्याचा विमा हप्ता भरणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाचे शासन निर्णय क्र.रास्वयो-२०१८/प्र.क्र.७४/ आरोग्य-६ दि.२६.०२.२०१९ अन्वये केंद्र शासनाची प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना या योजना संयुक्त पध्दतीने Insurance व Assurance Mode वर एकत्रितपणे राबविण्यास शासन मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. (शासन निर्णयाची प्रत संलग्न)

सदर शासन निर्णयात योजना राबविण्याची कार्यपध्दती, राज्य स्तरीय संनियंत्रण व कार्यकारी समिती, वित्तीय भार, विमा कंपनीची निवड, रूग्णालयाचे अंगीकरण, उपचार, योजनेतील रुग्णालय, योजना अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने निवड केलेली विमा कंपनी आणि अंगीकृत करण्यात येणार रूग्णालये यांच्याशी करावयाच्या करानाम्याचे अधिकारी, अंमलबजावणीचे नियम, कर्मचारी नियुक्ती, खर्चाचे अधिकार इत्यादी बाबत तपशील नमूद करण्यात आलेला आहे.

सदर योजनेमध्ये समाविष्ट अन्य घटकांशी संबंधित विभागांनी त्या घटकांची अद्यावत आकडेवारी वेळोवळी राज्य आरोग्य हमी सोसायटीस उपलब्ध करून देणे आवश्यक राहील असे नमूद केले आहे.

इतर तत्सम समान स्वरूपाच्या अन्य योजना संबधित विभाग/ कार्यालयाकडून राबविण्यात येत असतील तर लाभाची द्विरूक्ती टाळण्याकरीता ज्या दिनांक सदरील योजना सुरू होईल त्या दिनांकास संबंधित विभागांनी त्या बंद कराव्यात तसेच संबंधित विभागांनी विमा हप्ता अदा करताना द्विरूक्ती टाळण्याच्या अनुषंगाने लाभार्थ्यासंबंधात तपासणी करणे आवश्यक रहील, असे नमूद केले आहे.

राज्य आरोग्य हमी सोसायटीने योजनेची निविदा प्रकिया तात्काळ सुरू करून निविदा प्रक्रिया पूर्ण करून योजना लवकरात लवकर अंमलात आणण्याची कार्यवही करावी, असे निर्देश राज्य आरोग्य सोसायटीस देण्यात आलेले आहेत.

राज्य आरोग्य सोसायटीकडून योजनेची निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यांनतर नियुक्त संस्थेसोबत झालेल्या करारानुसार सदर योजना मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना लागू करण्यासाठीचा प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस सादर करण्यात येत आहे. याबाबत मंडळाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली व खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५०(५)/२०१९ :- सार्वजनिक आरोग्य विभागाच्या शासन निर्णय दि.२६.०२.२०१९ मधील अटी शर्तीनुसार मंडळातील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना लागू करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत राज्य आरोग्य सोसायटीकडून नियुक्त संस्थेसोबत होणाऱ्या करारानुसार वार्षिक विम्याची रक्कम मंडळामार्फत अदा करण्यासही मान्यता प्रदान करण्यात येत आहे. याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई | अध्यक्ष<br>महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार<br>कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.०६ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मा. मंत्री महोदय, कामगार यांच्या अध्यक्षतेखाली दि.०२.०८.२०१८ रोजी संपन्न आढावा बैठकीत महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) कडून प्रशिक्षणाबाबतच्या कृती आराखडयाचे सादरीकरण करण्यात आले होते. तसेच, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) यांच्या अध्यखतेखाली दि.११.१२.२०१८ रोजी आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित प्रशिक्षणाबाबत शासनास सादर केलेल्या प्रस्तावाची व कृती आराखडयाची प्रत मंडळास पाठविणेबाबत विनंती केली होती.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) यांनी त्यांच्या दि.२६.१२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये बांधकाम क्षेत्रात कामगार तसेच त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण देणेबाबतचा प्रस्ताव आणि कृती आराखडा कामगार विभागास सादर करून त्याची प्रत मंडळास सादर केली होती. सदर प्रस्ताव व त्यासोबतच्या कृती आराखडयातील बाबी खालीलप्रमाणे मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आल्या होत्या.

१. राज्यातील ३४ जिल्हयात २७,००,७९० लक्ष एवढया कुशल बांधकाम कामगारांची आवश्यकता आहे. याबाबतचा जिल्हानिहाय तपशील सादर करण्यात आलेला आहे.
२. MSSDS या संस्थेकडून २९०९ Empanelled व ११८३२ नोंदणीकृत VTPS आहेत. त्यापैकी बांधकाम क्षेत्रातील प्रशिक्षणासाठी २६३ VTPS Empanelled असून व १६५२ VTPS नोंदणीकृत आहेत.
३. MSSDS मार्फत २६१८ बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यात आले असून १८८३ बांधकाम कामगार प्रशिक्षण घेत आहेत.
४. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांसाठी प्रस्तावित प्रशिक्षण, प्रशिक्षणासाठी उददीष्ट व सदर प्रशिक्षणाकरीता अपेक्षित खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे सादर करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षण प्रकार | प्रशिक्षण उददीष्ट | प्रस्तावित निधी (रू. कोटी) |
|---|---|---|---|
| १. | बांधकाम कामगारांना बांधकम क्षेत्रातील कौशल्य विकास प्रशिक्षण | १,५०,००० | १५८.४३ |
| २. | बांधकाम कामगारांच्या कुटूंबियांसाठी विविध क्षेत्रातील कौशल्य विकास प्रशिक्षण | १,००,००० | १७६.९३ |
| | **एकूण** | **२,५०,०००** | **३३५.३६** |

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित प्रशिक्षणाचे सादरीकरण MSSDS या संस्थेकडून करण्यात आले.

MSSDS या संस्थेकडून करण्यात आलेल्या सादरीकरणाबाबत चर्चा करताना मा. प्रधान सचिव, कामगार विभाग यांनी सूचित केले की, नोंदीत बांधकाम कामगारांकरीता प्रस्तावित ०६ बाबींवरील प्रशिक्षणाशिवाय राज्य शासनाने सन २०१८ अधिसूचनेद्वारे बांधकामाच्या व्याख्येत २१ नवीन कामांचा समावेश केलेला आहे. सदर कामांवर काम करणाऱ्या नोंदीत बांधकाम कामगारानांही त्या त्या बाबींवरील कामांचे प्रशिक्षण मिळण्यासाठी सदर बाबीचा समावेश प्रशिक्षणाच्या प्रस्तावात करण्यात यावा. याबाबत सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली.

सदर विषयावर सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ४९(५)/२०१९: महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील नोंदीत बांधकाम कामगारांना व त्यांच्या पाल्यांना कौशल्य विकास प्रशिक्षण महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) या संस्थेमार्फत देण्यास मान्यता देण्यात येत आहे. सदर प्रशिक्षणाच्या बाबींमध्ये बांधकामाच्या व्याख्येत नव्याने समाविष्ट २१ कामासंबंधित बाबींचा समावेश करण्यात यावा तसा सुधारित प्रस्ताव महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास समिती (MSSDS) या संस्थेकडून मागविण्यात यावा व सदर प्रस्ताव शासन मान्यतेकरीता सादर करण्यात यावा व शासन मान्यतेनुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.**

मंडळाच्या उपरोक्त ठरावानुसार दि.०२.०२.२०१९ रोजी प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात आला होता.

मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना दयावयाच्या कौशल्य वृध्दीकरण योजना (RPL) करीता नियुक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर्स व असेसिंग बॉडी सोबत करण्यात आलेल्या करारनाम्याची मुदत दि.२६.०२.२०१९ रोजी संपुष्टात आली आहे. सदर करारनाम्याची मुदत पुढील ०१ वर्षाकरीता वाढविणे प्रस्तावित आहे.

तसेच, महाराष्ट्र स्थावर संपदा नियामक प्राधिकरण (महारेरा) कडून दिनांक २२.०२.२०१९ अन्वये प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावात मा. मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते दि.१९.०२.२०१९ रोजी शुभारंभ झालेल्या कार्यक्रमाचा महारेरा मार्फत टप्पा टप्प्याने ५०० तज्ञ बांधकाम प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यात येत आहे व सदर तज्ञ प्रशिक्षित प्रशिक्षकामार्फत बांधकाम कामगारांचे कौशल्य उन्नतीकरण (RPL Up skill) करण्यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. माहे मार्च २०१९ अखेर पर्यंत महारेराकडे ८० प्रशिक्षित तज्ञ उपलब्ध होणार आहे. महारेरा कडे नोंदणीकृत सुमारे १५,००० प्रकल्पांतर्गत १० ते १२ लाख बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्याचा मानस महारेराने व्यक्त केलेला आहे. सद्यस्थितीत १५,००० हजार नोंदणीकृत प्रकल्पांपैकी सुमारे ५०० नोंदणीकृत प्रकल्पांमध्ये सुमारे १०,००० कामगारांना त्वरीत प्रशिक्षण

देणे शक्य आहे असा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. याबाबतही मंडळाच्या बैठकीत निर्णय घेणे आवश्यक आहे.

याबाबत, मालक प्रतिनिधी श्रीम वेदा आगटे यांनी चर्चेत सहभागी होताना नियुक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर व असेसिंग बॉडीजला मुदतवाढ देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. मा. मंत्री महोदय, कामगार विभाग यांनी निर्देश दिले की, नियुक्त संस्थांना मुदतवाढ देण्यात यावी. तथापि, नियुक्त संस्थेकडून मागील दीड वर्षात फार कमी बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. मंडळाकडील नोंदीत सक्रिय (जिवीत) बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देण्यासाठी मंडळ स्तरावर PMC (Project Management Consultant) ची नियुक्ती करणे उचित राहील. PMC ची नियुक्ती होईपर्यंत महारेरा कडून प्राप्त प्रस्तावानुसार १०,००० नोंदीत बांधकाम कामगारांना प्रशिक्षण देणेबाबत महारेरास कळविण्यात यावे. यास सर्व उपस्थितांनी सहमती दर्शविली व खालील प्रमाणे ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

**ठराव ५०(६)/२०१९ :- शासन मान्यतेने नियुक्त ट्रेनिंग प्रोव्हायडर, असेसिंग बॉडीज सोबत करण्यात आलेल्या करानाम्याची मुदत पुढील ०१ वर्षाकरीता वाढविण्यात यावी, यापुढील RPL प्रशिक्षणाच्या व्यवस्थापनाकरीता मंडळ स्तरावरून PMC (Project Management Consultant) ची नियुक्ती करण्यात यावी. मंडळ स्तरावर PMC (Project Management Consultant) ची नियुक्ती होईपर्यंत महारेराकडून प्राप्त प्रस्तावानुसार १०,००० नोंदीत बांधकाम कामगारांना महारेरा मार्फत RPL चे प्रशिक्षण केंद्र शासनाच्या प्रचलित निकषानुसार देण्यात यावे. PMC (Project Management Consultant) ची नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेस सादर करण्यात यावा असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला होता.**

**सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**अध्यक्ष**
**महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार**
**कल्याणकारी मंडळ, मुंबई**

**विषय क्र.०७ : मंडळाच्या मुख्यालयातील कामकाजाकरीता संगणक, लॅपटॉप, प्रिंटर व  स्कॅनर खरेदीस मंजूरी मिळणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, मंडळाचे मुख्यालय, विभागीय, व जिल्हा कार्यालयाच्या कर्मचाऱ्यांना बांधकाम कामगारांची नोंदणी करणे, मंडळाच्या विविध कल्याणकारी योजना राबविणे व त्यांना लाभ देण्यासाठी संगणक व प्रिंटर्स उपलब्ध करुन देणे बाबत मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ च्या बैठकीमध्ये सर्वानुमते ठराव संमत करण्यात आला व त्या नुसार शासनाच्या दि. ३०.०६.२०१६ रोजीच्या पत्रान्वये मंडळाचे मुख्यालय, विभागीय कार्यालये व जिल्हा कार्यालयांकरीता आवश्यक संगणक व प्रिंटर्स खरेदीस मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच, मंडळाकडे उपलब्ध असलेल्या कर्मचारी व संगणकांची संख्या पाहता व दिवसेंदिवस मंडळाच्या कामाचा वाढता व्याप पाहता अपूऱ्या संगणक व प्रिंटर्सच्या संख्येमुळे मंडळाच्या दैनंदिन कामकाजामध्ये बरेच अडथळे निर्माण होत असल्याने व मंडळाकडे उपलब्ध असलेले संगणक व प्रिंटर्स चार ते पाच वर्षापूर्वीचे खरेदी केलेले असून ते वारंवार ना दुरुस्त करावे लागत होते व त्यांच्या दुरुस्तीवर वारंवार खर्च करावा लागत होता. त्यामुळे प्रशासकीय खर्चात सुध्दा वाढ होत होती. सदर बाबी लक्षात घेता मंडळाच्या मुख्यालयाकरीता ११ संगणक व प्रिंटर्स शासनाच्या Gem Portal वरुन खरेदी करण्यास मंडळाच्या दि.०३.०१.२०१८ च्या बैठकीमध्ये सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली होती. त्यानुसार दि. १९.०६.२०१८ रोजी मे. केजीएम ग्रुप सिस्टीम सोल्युशन या कंपनीकडून नविन ११ संगणक, ५ प्रिंटर्स खरेदी करण्यात आले आहे.

मंडळाकडुन अटल विश्व कर्मा सन्मान योजनेंतर्गत नोंदणी अभियान राबविण्यात आलेली असून त्यामुळे बांधकाम कामगारांच्या नोंदणीमध्ये झालेली वाढ व नोंदीत बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजना, प्रत्येक जिल्हयात सुविधा केंद्र उभारणे, एकात्मक संगणकीय प्रणाली, सायकल वाटप इ. प्रस्तावित योजनांच्या ई-निविदा बाबतचा कामकाजासाठी १ लॅपटॉप व मंडळाच्या कामाचा वाढता व्याप पाहता मंडळामध्ये अतिरिक्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने, मंडळाकडे उपलब्ध असलेले संगणक व प्रिंटर्स अपूरे पडत असल्यामुळे ५ संगणक, ३ प्रिंटर्स व २ स्कॅनरची आवश्यकता आहे. करीता मंडळ मुख्यालयाकरीता ५ संगणक, ३ प्रिंटर्स व २ स्कॅनर, १ लॅपटॉप शासनाच्या Gem Portal वरुन खरेदीस व त्यावरील खर्चास मंडळाची मान्यता मिळणेबाबत

प्रस्ताव मंडळाच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर विषयाबाबत मंडळाच्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव ५०(७)/२०१९ :- नोंदीत बांधकाम कामगारांकरिता राबविण्यात येणाऱ्या मध्यान्ह भोजन योजना, प्रत्येक जिल्हयात सुविधा केंद्र उभारणे, एकात्मिक संगणकीय प्रणाली, सायकल वाटप इ. योजना नव्याने सुरू झालेल्या आहेत त्यामुळे मंडळ स्तरावरील कामकाजात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. मुख्यालय स्तरावरील या योजनांच्या कामकाजाकरीता १ लॅपटॉप, ५ संगणक, ३ प्रिंटर्स व २ स्कॅनर शासनाच्या Gem Portal वरुन खरेदीस व त्यावरील अंदाजित रू. ३.७५ लक्ष एवढया खर्चास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे.**

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

## विषय क्र. ०८: मंडळाचे सन २०१८-२०१९ चे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक व सन २०१९-२०२० चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूर करणेबाबत

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ मधील कलम २५ नूसार मंडळाने प्रत्येक आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक विहित केलेल्या नमुन्यात तयार करुन ते केंद्र शासन व राज्य शासनास सादर करणेबाबत तरतूद आहे.

त्यानुसार, मंडळाचे सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाचे रु. १९२०.०० कोटी एवढया रकमेचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करुन मंडळाच्या मान्यतेने केंद्र व राज्य शासनास सादर करण्यात आले होते.

मंडळाचे सन २०१९-२० या आर्थिक वर्षाचे रु. २००४.६८ कोटी जमेचे व रु. ३७७८.०० कोटी एवढया खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, ते मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे. (अंदाजपत्रकाची प्रत सोबत संलग्न)

➢ **मंडळाच्या मागील ३ वर्षातील जमा-खर्चाचा तपशील खालीलप्रमाणे**

(रु. कोटीत)

| | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ष | उपकर जमा | विविध योजनांवरील खर्च | आस्थापना खर्च व खर्चाचे प्रमाण | एकूण खर्च |
| १. | २०१५-१६ | ११११०.०४ | ३५.२१ | २१.०५ (५९.७८%) | ५६.२६ |
| २. | २०१६-१७ | १०६९.८४ | १४.८५ | ६.२० (४२.१४%) | २१.०५ |
| ३. | २०१७-१८ | ११७०.०० | १५१.४४ | ६.०१ (४.६५%) | १५७.४५ |
| ४. | २०१८-१९ (मूळ अंदाज) | १२५०.०० | १८७०.०० | ३.२७ | १८७३.२७ |
| ५. | २०१८-१९ (माहे जानेवारी २०१९) | १००१.८९ | २१९.३४ | ३.२७ | २२२.६१ |
| ६. | २०१८-१९ चे सुधारित अंदाज | १२५०.०० | ३००.०० | ४.०० | ३०४.०० |

## सन २०१९-२० या वर्षाच्या प्रस्तावित अंदाजपत्रकाच्या ठळक बाबी

अ) जमा

| अ. क्र. | जमेची बाब | जमेचे दर | अपेक्षित जमा (रु. कोटीत) |
|---|---|---|---|
| १ | उपकर | एकूण बांधकाम खर्चाच्या(जमीनीचे मुल्य वगळता) १% | १३५०.०० |
| २ | नोंदणी फी | प्रति लाभार्थी रु. २५/- | १.३८ |
| ३ | वर्गणी | प्रति महिना रु. ०१/- | ३.३० |
| ४ | मुदतठेवीवरील व्याज | बँकेचे प्रत्यक्ष व्याजदर | ६५०.०० |
| | **एकूण** | | **२००४.६८** |

ब) खर्च

| अ.क्र. | खर्चाची बाब | अपेक्षित खर्च (रु. कोटीत) |
|---|---|---|
| १ | बांधकाम कामगारांच्या विविध कल्याणकारी योजना | ३४७७.२१ |
| २ | प्रशासकीय/कार्यालयीन खर्च | १६.७९ |
| ३ | प्रस्तावित योजना | २४६.०० |
| ४ | उपकर अधिनियमाचे कलम ३ नुसार जमा उपकराच्या १ % परतावा | २०.०० |
| ५ | उपकर परताव्याची प्रकरणे | १८.०० |
| | **एकूण** | **३७७८.००** |

वरीलप्रमाणे मंडळाचे सन २०१९-२० च्या आर्थिक वर्षाचे रु. २००४.६८ कोटी जमेचे व रु. ३७७८.०० कोटी एवढया खर्चाचे (बाबनिहाय जमा खर्चाच्या अंदाजपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे.) अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता. सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाची मंडळाने नोंद घेतली व चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव ५०(८)/२०१९ :- मंडळाचे सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाचे सुधारित अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास व २०१९-२०२० च्या आर्थिक वर्षाचे रू.२००४.६८ कोटी जमेच्या व रू.३७७८.०० कोटी एवढया खर्चाच्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम १९९६ च्या तरतूदीनुसार राज्य शासन व केंद्र शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते पारित करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र. ०९ :- मंडळाच्या सन २०१६-१७ व २०१७-१८ च्या वार्षिक लेख्यांस मान्यता देणे.**

याबाबत मंडळ सचिव यांनी असे सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७ अन्वये मंडळाचे प्रत्येक आर्थिक वर्षाचे लेखे तयार करून लेखे, लेखापरीक्षकांचे अहवालासह विधीमंडळासमोर सादर करणेसाठी शासनास सादर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १ अन्वये सन २००७-०८ ते २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या, मंडळाच्या दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १४ अन्वये सन २०१२-१३ व २०१३-१४ च्या वार्षिक लेख्यांस मान्यता देण्यात आली होती. सदर वर्षांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून पूर्ण करण्यात आले आहे. तसेच त्यांचे वार्षिक अहवाल लेखापरीक्षण अहवालासह शासनास सादर करण्यात येऊन विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आले आहेत.

तसेच मंडळाच्या दि. ०३.०१.२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. १५ अन्वये सन २०१४-१५ व मंडळाच्या दि. २२.०५.२०१८ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ८ अन्वये सन २०१४-१५ व २०१५-१६ च्या सुधारित वार्षिक लेख्यांस मानयता देण्यात आली होती. त्यानुसार सदर वर्षांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांजकडून दि. २७.११.२०१८ ते दि. १३.१२.२०१८ या कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१४-१५चा लेखा परिक्षण अहवाल मंडळास प्राप्त झालेला आहे. व सन २०१५-१६ या वर्षाचा लेखापरिक्षण अहवाल लवकरच प्राप्त होणे अपेक्षित आहे.

मंडळाचे सन २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षांचे लेखा अहवाल मंडळाने नियुक्त केलेल्या मे. के. एस. सघवी या सनदी लेखापालांकडून पूर्ण करून घेण्यात आले आहे(प्रत सोबत सलग्न). सदर लेख्यांना मंडळाची मान्यता प्रदान करावी तद्नतंर सदर लेख्यांचे संव्यवहार लेखापरिक्षण (Transaction Audit) करण्यासाठी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना विनंती करण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव ५०(९)/२०१९ :- सन २०१६-१७ व २०१७-१८ च्या वार्षिक लेख्यांस मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

| | |
|---|---|
| सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | अध्यक्ष |
| महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई | महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ, मुंबई |

**विषय क्र.१० : मंडळाच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक अहवालास मंजूरी देणेबाबत.**

याबाबत मंडळ सचिव यांनी सादर केले की, इमारत आणि इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ च्या कलम २७(५) अनुसार महाराष्ट्र इमारत आणि इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ मुंबई यांचा वार्षिक अहवाल लेखापरीक्षकांचे अहवालासह विधीमंडळासमोर सादर करणे आवश्यक आहे.

त्यानुसार मंडळाच्या दि. ०५.१२.२०१६ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १ अन्वये सन २००७-०८ ते २०११-१२ या आर्थिक वर्षाच्या लेखा / लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली होती व सदर २००७-०८ ते २०११-१२ चे अहवाल मंडळाकडून शासनास सादर करण्यात आले. सदर वर्षांचे वार्षिक अहवाल विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात दि. ११.०८.२०१७ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर केल्याचे शासनाच्या दि. १५.०९.२०१७ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

तसेच मंडळाच्या दि. ०६.०६.२०१७ रोजीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. १४ अन्वये सन २०१२-१३ व २०१३-१४ या आर्थिक वर्षाच्या लेखा / लेखा परिक्षण अहवाल व वार्षिक अहवालास मान्यता प्रदान करण्यात आली होती व सदर २०१२-१३ व २०१३-१४ चे अहवाल मंडळाकडून शासनास सादर करण्यात आले. सदर वर्षांचे वार्षिक अहवाल दि. ३०.११.२०१८ रोजी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर करण्यात आले आहेत.

मंडळाचे सन २०१४-१५ व २०१५-१६ या आर्थिक वर्षाच्या लेख्यास मंडळाच्या दि. ३०.१०.२०१८ च्या बैठकीत दिलेल्या मान्येतेनंतर त्यांचे लेखापरीक्षण महालेखापाल कार्यालयाकडून दि. २७.११.२०१८ ते १३.१२.२०१८ या कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे. सन २०१४-१५ या वर्षाचा लेखापरीक्षण अहवाल मडळास प्राप्त झाला आहे.

सन २०१४-१५ या वर्षाचे वार्षिक अहवाल लेखापरीक्षण अहवालासह विधीमंडळाच्या आगामी अधिवेशनात विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात सादर ठेवण्यासाठी शासनास सादर करावयाचे आहेत. तत्पूर्वी या अहवालास मंडळाची मान्यता प्रदान होणे आवश्यक आहे. तरी, सन २०१४-१५ या आर्थिक वर्षाचा वार्षिक अहवाल मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात आला होता.

सविस्तर चर्चेअंती खालीलप्रमाणे ठराव घेण्यात आला.

ठराव ५०(१०)/२०१९ :- सन २०१४-१५ च्या वार्षिक अहवालास मंडळाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर वार्षिक अहवाल विधीमंडळासमोर सादर करण्यासाठी शासनास सादर करण्यात यावा, असा ठराव सर्वानुमते घेण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

**विषय क्र.११:- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या जमा उपकर निधीच्या गुंतवणुकीचा गोषवारा मंडळाच्या मान्यतेस सादर करणे**

मंडळ सचिवांनी सादर केले की, महाराष्ट्र इमारत व इतर कल्याणकारी मंडळाच्या दि. २१.०३.२०१८ रोजीच्या संपन्न झालेल्या बैठकीमध्ये माहे ऑक्टोबर, २०१८ पर्यंतची मंडळाने केलेल्या रक्कम रु. ७९४० कोटी मुदत ठेव गुंतवणूकीचा गोषवारा सादर करण्यात आला होता व सदर गोषवाऱ्यातील गुंतवणूकीस व गुंतवणूकीच्या व्याजदरास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

शासन वित्त विभागाच्या दि. २७.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार गुंतवणूकीचा माहे ऑक्टोबर ते डिसेंबर २०१८ या कालावधीचा त्रैमासिक अहवाल दि. २५.०२.२०१९ रोजी प्रशासकीय विभागास सादर करण्यात आलेला आहे

सद्यस्थितीत महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाने माहे २४ जानेवारी, २०१९ अखेर केलेल्या जमा उपकर रक्कमेच्या गुंतवणूकीचा गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

| अनु क्र. | बँकेचे नाव | FDR No. | गुंतवणूक दिनांक | परिपक्व दिनांक | गुंतवलेली रक्कम (रू.कोटीत) | व्याजदर द.सा.द. शे. | गुंतवणूकीच् यपरिपक्वते नंतर मिळणारी रक्कम (रू. कोटीत) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | बँक ऑफ बडोदा, बांद्रा (पुर्व), मुंबई | २९०४०३०००३१३१९ | १६.०४.२०१८ | १६.०४.२०१९ | ५०० | ६.८५ | ५३५.१३ |
| २. | इंडियन बँक, जुहू विलेपार्ले, मुंबई | ६६३०६८४३६५<br>TDR NO. ०५२६५५३ | ०८.०५.२०१८ | ०८.०५.२०१९ | १००० | ७.०१ | १०७१.९६ |
| ३. | विजया बँक, बांद्रा (पुर्व), मुंबई | ५००२०३५०१०००११५<br>Recipt No. ५०४६८ | १५.०५.२०१८ | १५.०५.२०१९ | १००० | ७.०६ | १०७२.४९ |
| ४. | सिंडीकेट बँक, मरोल ब्रॅन्च, मुंबई | ५०३२५११००००५/१<br>Recipt No. SBN ९६२०९० | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१९ | ४०० | ७.११ | ४२९.२० |
| ५. | पंजाब अॅन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०००५११५७<br>Recipt No. ३९३४६३ | २२.०५.२०१८ | २२.०५.२०१९ | ४०० | ७.११ | ४२९.२० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ६. | पंजाब अॅन्ड सिंध बँक, मलबार हिल, मुंबई | ०४२८१४०००५११५७ | ३०.०६.२०१८ | ३०.०६.२०१९ | ६०० | ७.२३ | ६४४.५७ |
| ७. | युनियन बँक ऑफ इंडिया, विलेपार्ले पश्चिम,मुंबई | ४०८१०३०३०५७९११३२ Recipt No. ८४३६३२ | २८.०८.२०१८ | २८.०८.२०१९ | ८५० | ७.११ | ९१२.०६ |
| ८. | आंध्रा बँक, खार पश्चिम, मुंबई | ११३९२०१०००८४७६२ Recipt No. १५६२२४ | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | १००० | ७.४० | १०७६.०७ |
| ९. | पंजाब नॅशनल बँक,वरळी नाका, मुंबई | ०५६४००UR००००९१८ Recipt No. ०५६४०० | ०६.१०.२०१८ | ०६.१०.२०१९ | ३९० | ७.४० | ४१९.६७ |
| १०. | इंडियन ओव्हरसीस बँक, बांन्द्रा पुर्व मुंबई | १२८०४०००००७९४८ Recipt No. NDRR०८३३३८४ | ११.०१.२०१९ | ११.०१.२०२० | १००० | ७.५१ | १०७७.२४ |
| ११. | कॅनरा बँक, ओव्हरसीस ब्रॅन्च, बीकेसी, मुंबई | १५८१४०१००६११/१ Recipt No. KK३८४३८३ | २४.०१.२०१९ | २४.०१.२०२० | १००० | ७.६० | १०७८.१९ |
| | | एकुण | | | ८१४० | | ८७४५.८३ |

उपरोक्त शासन निर्णयातील मार्गदर्शक सुचनानुसार प्रत्येक महिन्याला मुदत ठेवीच्या रकमा सुरक्षित असून त्यावर कोणत्याही प्रकारचे कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र संबंधित ठेवीदार बँकांकडून घेणे अनिवार्य आहे. त्यानुसार मंडळाच्या अतिरिक्त निधीची गुंतवणूक ज्या बँकांत करण्यात आलेली आहे त्या बँकाकडुन प्रत्येक महिन्याला मंडळाची गुंतवणूक सुरक्षित असून त्यावर कर्ज/तारण/ओवर ड्राफट नसल्याचे प्रमाणपत्र नियमित प्राप्त करून घेण्यात येतात त्यानुसार माहे जानेवारी २०१९ पर्यतच्या कालावधीत मंडळाच्या इंडियन बँक, आंध्र बँक, बँक ऑफ बडोदा या खातेदार बँकांची मुदत ठेव गुंतवणुक सुरक्षित असल्याची प्रमाणपत्रे प्राप्त झालेली आहे.

मंडळाने माहे २४ जानेवारी, २०१९ पर्यंत एकुण रक्कम रू. ८१४० कोटी एवढया जमा निधीची विविध बँकेंत केलेल्या गुंतवणुकीचा उपरोक्त गोषवारा मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

उपरोक्त विषयाची सर्व मंडळ सदस्यांनी नोंद घेतली. त्याबाबतचा ठराव खालीलप्रमाणे

ठराव ५०(११)/२०१९ :- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या उपसमितीने दिनांक २४ जानेवारी, २०१९ पर्यंत जमा उपकर रक्कम रू. ८१४० कोटी एवढया निधीचा विविध राष्ट्रीयीकृत बँकेंत केलेल्या गुंतवणुकीचा त्रैमासिक गोषवारा व गुंतवणूकीच्या सुरक्षेसंदर्भात करण्यात येत असलेल्या विविध उपायोजनांची माहिती मंडळास सादर करण्यात आली. सदर माहितीची सर्व मंडळ सदस्यांनी नोंद घेतली. असा ठराव सर्वानुमते पारीत करण्यात आला.

सचिव तथा मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई

अध्यक्ष
महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार
कल्याणकारी मंडळ, मुंबई